# शिरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास

**डॉ. दिपक प्रभाकर बाविस्कर**
आर. सी. पटेल शिक्षणशास्त्र
महाविद्यालय, शिरपूर जि. धुळे

**सारांश -**

*प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण-सहसंबंध संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. सहेतूक नमुना निवड पद्धतीने १६० माध्यमिक शाळांतील शिक्षकांची निवड करण्यात आली होती. माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ. हरिष शर्मा,आग्रा व डॉ. राजीव लोचन, भारद्वाज मानसशास्त्र विभाग डी.एस. महाविद्यालय अलीगड यांची भावनिक कार्यक्षमता प्रमाणित चाचणी तसेच डॉ. उमी कुलसूम यांनी प्रमाणित केलेली अध्यापन परिणामकारकता मापन चाचणी या संशोधन साधनांचा अवलंब केला होता. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा 'r' सहसंबंध गुणकाचा अवलंब करण्यात आला होता. निष्कर्षात असे दिसून आले की, शिरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ व उच्च सहसंबंध आहे.*

## प्रस्तावना

जीवनात प्रत्येकास कोणता न कोणता व्यवसाय हा करावाच लागतो. तसेच शिक्षकी पेशा हा सुद्धा एक व्यवसाय आहे. जीवनात मनुष्यास हवा असणारा व्यवसाय जर मिळाला तर तो त्या व्यवसायात मन लावुन काम करतो. म्हणजेच ज्याची भावनिक समरसता त्या व्यवसायाशी जुळते व तो अधिक प्रगती करतो. जो दुसऱ्यांना समजून घेतो व स्वतःच्या भावनांवर नियंत्रण ठेवतो तो व्यक्ती जीवनात यशस्वी होतो. तसेच समाजात आपल्याला प्रत्येकाची भावनिक कार्यक्षमता ही वेगवेगळी आढळून येते. एका शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता ही चांगल्या प्रकारची असली पाहिजेत. कारण शिक्षकास विद्यार्थ्यांना समजून घ्यावयाचे असते. मूल्यांच्या भावना कशा आहेत हे त्यास ओळखता आले पाहिजेत. म्हणजे तो विद्यार्थ्यांशी चांगल्या प्रकारे वागु शकतो. परिणामी चांगल्या प्रकारे मार्गदर्शन करू शकतो. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांचा सहसंबंधात्मक अभ्यास ही समस्या निवडण्याचे कारण म्हणजे आजच्या शिक्षण प्रणालीत भावनात्मक क्षेत्राच्या विकासाकडे पुर्ण दुर्लक्ष झाल्याचे दिसून येते.

शिक्षण पूर्ण केलेला विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहण्यास असमर्थ असतो तो पुढे त्याच्या जीवनात कोणत्या कोणत्या क्षेत्रात जातो पण तो आपल्या जीवनात भावनिक कार्यक्षमतेच्या कमतरतेमुळे कमी पडतो. शिक्षकाला दैनंदिन कर्तव्य पार पाडत असतांना मुख्याध्यापक, पर्यवेक्षक, सहशिक्षक, कार्यालयीन कर्मचारी, सेवक, विद्यार्थी यांच्याशी तर शाळा समितीचे सदस्य शाळेला भेट देतात. पालक शिक्षणाधिकारी व इतर मान्यवर यांच्याशी संबंध येतो. नित्य बदलणारी परिस्थिती व वेगवेगळ्या व्यक्तीच्या अपेक्षा भावना जाणून त्यांच्याशी स्वतःच्या गरजा अपेक्षांची सांगड घालून जमवून घ्यावे लागते जर माध्यमिक शिक्षकांमध्ये भावनिक कार्यक्षमता उच्च दर्जाची असली तर तो चांगल्या प्रकारे समायोजन करून आव्हानांना तोंड देऊ शकेल. परंतु भावनिक कार्यक्षमतेची कमतरता त्याला अपयशाकडे घेऊन जाते. शिक्षक, विद्यार्थी, पालक, मुख्याध्यापक यांच्याशी योग्य प्रकारे समायोजन करू शकणार नाही. म्हणून चांगल्या प्रकारे समायोजन करण्यासाठी भावनिक कार्यक्षमतेची गरज आहे. म्हणून संशोधकाने माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांचा सहसंबंध अभ्यासणे ही समस्या निवडली आहे.

## समस्या विधान

शिरपूर शहरातील माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

## उद्दिष्टये

१. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करणे.

## परिकल्पना

१. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.
२. माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.
३. माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनात माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यातील सहसंबंधाचा अभ्यास करण्यासाठी सर्वेक्षण व सहसंबंधात्मक संशोधन पद्धतीचा अवलंब करण्यात आला होता. प्रस्तुत संशोधनात शिरपूर तालुक्यातील माध्यमिक स्तरावर अध्यापन करणारे सर्वच स्त्री व पुरूष शिक्षकांची जनसंख्या म्हणून निश्चिती करण्यात आली होती. प्रस्तुत संशोधनासाठी संशोधकाने सहेतूक नमूना निवड पद्धती एकुण १६० शिक्षकांची निवड केली होती. त्यात ८० स्त्री शिक्षिका व ८० पुरूष शिक्षकांचा समावेश होता. माहितीचे संकलन करण्यासाठी डॉ. हरिष शर्मा आग्रा व डॉ. राजीव लोचन भारद्वाज मानसशास्त्र विभाग डी.एस. महाविद्यालय अलीगड यांची भावनिक कार्यक्षमता प्रमाणित चाचणी अवलंब केला होता. यात एकुण ३० प्रश्न आहे. तसेच डॉ. उमी कुलसूम यांनी प्रमाणित केलेली अध्यापन परिणामकारकता मापन चाचणीचा अवलंब केला होता. यात एकूण ६० प्रश्न आहेत. संकलित माहितीचे विश्लेषण करण्यासाठी पिअरसन चा r सहसंबंध गुणकाचा अवलंब करण्यात आला होता.

**संकलित माहितीचे विश्लेषण व अर्थनिर्वचन**

**परिकल्पना क्रमांक ०१ :** माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

| माध्यमिक शाळेतील शिक्षक | शिक्षक संख्या | नमूना 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | स्वीकार /त्याग |
|---|---|---|---|---|
| भावनिक कार्यक्षमता | १६० | .१४८ | **०.७५०** | त्याग |
| अध्यापन परिणामकारकता | | | | |

प्रस्तुत संशोधनात df =१५८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .१४८ असून प्राप्त'r'मुल्य ०.७५० ऐवढे असून ते नमुना 'r' मुल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ सहसंबंध दिसून येतो. तसेच माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात उच्च सहसंबंध दिसून येतो.

**परिकल्पना क्रमांक ०२:** माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

| माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिका | संख्या | नमूना 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | स्वीकार /त्याग |
|---|---|---|---|---|
| भावनिक कार्यक्षमता | ८० | .२१७ | **०.६२०** | त्याग |
| अध्यापन परिणामकारकता | | | | |

प्रस्तुत संशोधनात df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .२१७ असून प्राप्त'r'मुल्य ०.६२० ऐवढे असून ते नमुना 'r' मुल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ सहसंबंध दिसून येतो. तसेच माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात उच्च सहसंबंध दिसून येतो.

**परिकल्पना क्रमांक ०३:** माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थक सहसंबंध आढळून येत नाही.

| माध्यमिक शाळेतील पुरूष | संख्या | नमूना 'r' मूल्य | प्राप्त 'r' मूल्य | स्वीकार /त्याग |
|---|---|---|---|---|
| भावनिक कार्यक्षमता | ८० | .२१७ | **०.६९८** | त्याग |
| अध्यापन परिणामकारकता | | | | |

प्रस्तुत संशोधनात df = ७८ साठी ०.०५ सार्थकता स्तरावर नमुना 'r' मूल्य .२१७ असून प्राप्त'r'मुल्य ०.६९८ ऐवढे असून ते नमुना 'r' मुल्यापेक्षा अधिक आहे. म्हणून शुन्य परिकल्पनेचा त्याग करावा लागेल. यावरुन असे दिसून येते की, माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ सहसंबंध दिसून येतो. तसेच माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात उच्च सहसंबंध दिसून येतो.

**निष्कर्ष**

१. माध्यमिक शाळेतील शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ व उच्च सहसंबंध दिसून येतो.
२. माध्यमिक शाळेतील स्त्री शिक्षिकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ व उच्च सहसंबंध दिसून येतो.
३. माध्यमिक शाळेतील पुरूष शिक्षकांची भावनिक कार्यक्षमता व अध्यापन परिणामकारकता यांच्यात सार्थ व उच्च सहसंबंध दिसून येतो.

**चर्चा**

प्रस्तुत संशोधनाच्या निष्कर्षात हे स्पष्ट दिसून येते की, शिक्षकांचा भावनिक कार्यक्षमतेचा उच्च व धनात्मक सहसंबंध हा त्यांच्या अध्यापन परिणामकारकतेशी आहे. म्हणूनच शिक्षकांच्या भावनिक कार्यक्षमता अधिक गतिशील कशी होईल याकडे शासनाने आणि संस्थानी अधिक लक्ष केंद्रित केले पाहिजे. शालेय व राज्यस्तरावर भावनिक बुद्धिमत्ता, भावनिक परिपक्वता तसेच भावनिक कार्यक्षमता याकडे अधिकाधिक लक्ष देणे गरजेचे आहे.

तसेच स्वतः शिक्षकांनी आपल्या भावनांचे नियोजन कसे करता येईल याविषयी प्रशिक्षण केंद्रात सहभाग घेतला पाहिजे.

**संदर्भग्रंथ सूची**


१. आगलावे, प्रदिप. (२०००). *संशोधन पद्धती शास्त्र व तंत्रे (प्रथम आवृत्ती).* नागपूर: विद्या प्रकाशन.
२. कदम, चा.प. (१९९९). *शैक्षणिक संख्याशास्त्र* (द्वितीय आवृत्ती). पुणे: नूतन प्रकाशन.
३. पंडीत बन्सी बिहारी. (२००५). *शिक्षणातील संशोधन (संख्यात्मक व गुणात्मक).* पुणे: नित्यनूतन प्रकाश्न.
४. सिंह, दलिप. (२००८). *भावनिक बुध्दिमत्ता- एक व्यावसायिक मार्गदर्शन.* पुणे : डायमंड पब्लिकेशन.
5. Chavan, S. S. (2007). *Advanced Educational Psychology*. New Delhi: Vikas Publishing House Pvt. Ltd.
6. Golman, Danial. (1996). *Emotional Intelligence (Why it can matter more than IQ).* London: Bloomsbury Publishing.
7. Woolfolk, Anita. (2005). *Educational Psychology.* ($9^{th}$Ed). Singapore: Pearson Education.


Aayushi International Interdisciplinary Research Journal
ISSN 2349-638X
www aiirjournal.com